SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, Phone No. 0231-2609296/9139
www.unishivaji.ac.in, Email ID : , pgbutr3@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र
दूरध्वनी –ईपीएबीएक्स -२६०९०००, फोन नं. ०२३१-२६०९२९६/९१३९,
www.unishivaji.ac.in, : pgbutr3@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र.: एस.यु./पीजीबीयुटीआर/प्रवेश प्रक्रिया/२०२४–२५/ 5396 दिनांक : 12 DEC 2024

प्रति,

१) मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

२) मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था/ स्वायत्त संस्था, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय** :– पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया २०२४–२५ पीएच.डी. मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडुन युजीसी पीएच.डी. रेग्युलेशन २०२२ नियम 6 (1) नुसार (Intake) प्रवेश क्षमता मागणी करणेबाबत.

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करिता पीएच.डी. मान्यता प्राप्त मार्गदर्शक यांचेकडून दि. ११ सप्टेंबर, २०२४ ते दि. २० सप्टेंबर, २०२४ व दि. २२ नोव्हेंबर, २०२४ ते दि. ०३ डिसेंबर, २०२४ या कालावधीमध्ये प्रवेश क्षमता मागणी करण्यात आली होती.

तथापि, सदरच्या कालावधीमध्ये पीएच.डी. साठी प्रवेश क्षमता कळविता आली नसल्याबाबत मान्यताप्राप्त मार्गदर्शक यांचेकडून पत्र प्राप्त झाली आहेत. सदरची पत्रे विचारात घेता **शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी प्रवेश क्षमता कळविण्यासाठी दि. १३/१२/२०२४ ते दि. १६/१२/२०२४ रात्री १२.०० वाजे पर्यंत संगणक प्रणालीद्वारे प्रवेश क्षमता भरण्यासाठी लिंक खुली करण्यात आली आहे.**

मान्यता प्राप्त मार्गदर्शक यांनी उपरोक्त माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२४ या मुदतीमध्ये पीएच. डी. साठी प्रवेश क्षमता कळविलेली नाही, अशाच मान्यता प्राप्त मार्गदर्शक यांनी त्यांची प्रवेश क्षमता सदरच्या मुदतीत संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन भरण्याची कार्यवाही करावी. सदर तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या ई–मेल/पत्रांवर कोणतीही कार्यवाही होणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आदेशान्वये
आपला विश्वासू

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत : वरील प्रमाणे

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, Phone No. 0231-2609296/9139
www.unishivaji.ac.in, Email ID : , pgbutr3@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र
दूरध्वनी –ईपीएबीएक्स -२६०९०००, फोन नं. ०२३१-२६०९२९६/९१३९,
www.unishivaji.ac.in, : pgbutr@unishivaji.ac.in

संदर्भ क्र.: एस.यु./पीजीबीयुटीआर/प्रवेश प्रक्रिया/२०२४–२५/ 5132 दिनांक : 22 NOV 2024

प्रति,

1) मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

2) मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त
संस्था / स्वायत्त संस्था, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय :– पीएच.डी. मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडुन युजीसी पीएच.डी. रेग्युलेशन 2022 नियम 6 (1) नुसार (Intake) प्रवेश क्षमता मागणी करणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2024–2025 च्या पीएच.डी. प्रवेश प्रकियेकरिता मान्यताप्राप्त पीएच.डी. संशोधन मार्गदर्शकांकडून रिक्त प्रवेश क्षमता या विभागाच्या संदर्भीय पत्र क्र. एसयु/पीजीबीयुटीआर/प्रवेश प्रक्रिया/2896 दि. 11 सप्टेंबर, 2024 नुसार दिनांक **11/09/2024 ते दि. 20/09/2024** अखेर या कालावधीमध्ये मागविण्यात आल्या होत्या. सदरच्या क़ालावधीमध्ये ज्या मार्गदर्शकांनी प्रवेश क्षमता कळविलेल्या आहेत त्यांनी पुनःश्च प्रवेश क्षमता कळविण्याची आवश्यकता नाही.

तथापि ज्या मान्यता प्राप्त मार्गदर्शकांनी उपरोक्त कालावधीमध्ये प्रवेश क्षमता कळविलेल्या नाहीत तसेच नव्याने मान्यता मिळालेल्या मार्गदर्शक यांचेसाठी प्रवेश क्षमता भरण्यासाठी वरील कालावधीसाठी पुन्हा लिंक सुरू करण्यात येत आहे. तरी सदर मान्यता प्राप्त मार्गदर्शक यांनी त्यांच्या स्वतःच्या जबाबदारीवर महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर पदवीसाठी सदर विषयाच्या कोर्ससाठी मान्यता आहे का आणि पदव्युत्तर शिक्षक मान्यता आहे का याची खातरजमा करूनच संबंधित शिक्षकांनी प्रवेशक्षमता **(Intake)** Online Form मध्ये दिनांक **22/11/2024 ते दि. 03/12/2024** अखेर भरावी.

तसेच या विभागाचे दि. 11 सप्टेंबर, 2024 रोजीचे परिपत्रक सोबत जोडले असून त्यामध्ये प्रवेश अर्ज भरण्यासाठीची लिंक देण्यात आली आहे. तसेच सदरच्या परिपत्रकामधील सर्व नियम व तरतुदी लागू असून सदरचे नियम/तरतुदींचे अवलोकन करून मान्यता प्राप्त मार्गदर्शक यांनी त्यांच्या जबाबदारीवर प्रवेश क्षमता कळवावी.

सदर परिपत्रक विहित कालावधीपुर्वी हे आपल्या अधिविभागामधील/महाविद्यालयामधील/संस्थेमधील सर्व मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक यांच्या निर्दशनास आणावे.

आदेशान्वये,
आपला विश्वासु,

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

प्रत – संगणक केंद्र.

o/c
22/11/24

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, Phone No. 0231-2609296/9139
www.unishivaji.ac.in, Email ID : , pgbutr3@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र
दूरध्वनी –ईपीएबीएक्स -२६०९०००, फोन नं. ०२३१-२६०९२९६/९१३९,
www.unishivaji.ac.in, : pgbutr3@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क. :– एस.यु./पीजीबीयुटीआर/प्रवेश प्रकिया /2898 दिनांक : 11 SEP 2024

प्रति,

1) मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

2) मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था / स्वायत्त संस्था, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय :– पीएच.डी. मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडुन युजीसी पीएच.डी. रेग्युलेशन 2022 नियम 6 (1) नुसार प्रवेश क्षमता कळविणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2024–2025 करिता मान्यताप्राप्त पीएच.डी. संशोधन मार्गदर्शकांकडून रिक्त प्रवेश क्षमता मागविण्यात येत आहे. सदर प्रवेशक्षमता Online Form मध्ये दिनांक **11/09/2024 ते दि. 20/09/2024** अखेर भरून द्यावयाची आहे.

**ज्या शिक्षकांची नियुक्ती विद्यापीठ अधिविभाग/ सलंग्नित पदव्युत्तर महाविद्यालय येथे पुर्णवेळ पदवी व पदव्युत्तर शिक्षक म्हणुन झालेली आहे, फक्त अशाच मान्यताप्राप्त मार्गदर्शकांनी प्रवेश क्षमता कळवावी.**

1. यासंदर्भात पीएच.डी. प्रवेश माहिती पुस्तिका मधील आर. आर. डी. 9 मधिल खालील तरतूदी अवलोकनी घेण्यात याव्यात.
   R.R.D.9. RESEARCH SUPERVISOR/GUIDE:
   9.7. An eligible Professor/Associate Professor/Assistant Professor can guide up to eight (8) / six (6) / four (4) Ph.D. scholars, respectively, at any given time
   Each supervisor can guide up to two international research scholars on a supernumerary basis over and above the predetermined number of Ph.D. scholar as specified in above clause. At any point, the total number of Ph.D. scholars under a faculty member, either as a supervisor or co-supervisor, shall not exceed the number prescribed in above clause.
   9.9 Faculty members with less than three years of service before superannuation shall not be allowed to take new research scholars under their supervision. However, such faculty members can continue to supervise Ph.D. scholars who are already registered until superannuation and as a co-supervisor after superannuation, but not after attaining the age of 70 years
   9.12 A seat will be considered vacant for admission purpose after the declaration of final result of the student by Shivaji University, Kolhapur or after six months from the date of submission of final Thesis/Dissertation, whichever is earlier.
2. दि. 7 नोव्हेबर 2022 रोजीच्या यु.जी.सी. पीएच.डी रेग्युलेशनमध्ये नमुद केलेनुसार पीएच.डी. संशोधक विद्यार्थी यांची संख्या शिक्षकांच्या पदानुसार असल्याने, संशोधन मार्गदर्शकांनी त्या प्रमाणातच प्रवेश क्षमता कळवावी.
3. विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. 07 नोव्हेंबर, 2022 रोजीच्या राजपत्रामध्ये मुद्दा क्रं. 6 (1) अन्वये संशोधन मार्गदर्शक मान्यतेसंदर्भात नमूद केलेले नियम विहीत केलेले आहेत. या अनुषंगाने विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधित मार्गदर्शक यांनी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून आर. आर.डी. 9 नुसार प्रवेश क्षमता कळवावी.
   1. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 07 नोव्हेंबर, 2022 च्या अधिसूचनेमधील संशोधन मार्गदर्शक मान्यतेसदंर्भातील तरतुदीनुसार अर्जदार अध्यापक नियमित स्वरूपात ज्या महाविद्यालयात कार्यरत आहे त्या महाविद्यालयात संबंधित विषय हा पदव्युत्तर स्तरावर शिकविला जात असेल तरच संबंधित विषयात संशोधन मान्यता प्राप्त मार्गदर्शकांनी संशोधक विद्यार्थी घेणेसाठी प्रवेश क्षमता कळवावी.
   2. विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. 07 नोव्हेंबर, 2022 ची अधिसूचना निर्गमित होण्यापूर्वी ज्या अध्यापकांना त्यांच्या महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविला जात नाही तरीही संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेली आहे ती त्यांना नवीन विद्यार्थी न घेण्याच्या अटीवर सुरू ठेवण्यात येत आहे.

3. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 07 नोव्हेंबर, 2022 रोजीच्या अधिसूचनेनंतर ज्या अध्यापकांना, ते कार्यरत असलेल्या महाविद्यालयांत संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविला जात नाही, तरीही संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेली आहे अशा अध्यापकांनी ते कार्यरत असलेल्या महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाने सलंग्नीकरण दिल्याचा पुरावा सादर केल्यानंतरच त्यांना पीएच.डी. चे विद्यार्थी घेण्यास मुभा देण्यात येईल.

4. संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेल्या अध्यापकांची संस्थेतर्गत इतर महाविद्यालयात बदली किंवा इतर महाविद्यालयात नव्याने नियुक्ती झाल्यास व अशा महाविद्यालयात संबंधित विषय पदव्युत्तर पदवी स्तरावर शिकविला जात नसल्यास वरील परिच्छेद कं. 2 प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

5. त्याचप्रमाणे संबंधित सर्व मान्यता प्राप्त मार्गदर्शक यांनी प्रवेश क्षमतेचा अर्ज भरत असताना महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाने सलंग्नीकरण दिल्याचा पुरावा (Upload) सादर केल्यानंतरच व त्याचबरोबर संबंधित शिक्षक हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवित असलेबाबत प्राचार्य यांचे स्वाक्षरीमार्फत हमीपत्र सादर (Upload) केल्यानंतरच त्यांची प्रवेश क्षमता 2024–2025 साठी ग्राहय धरण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन फॉर्म **http://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login** लिंकवर ठेवणेत आला आहे. तेंव्हा सदर फॉर्म हस्तलिखित भरू नये. ऑनलाईन फॉर्म भरत असताना Affiliation Portal मधून देण्यात आलेला login ID वापरावयाचा आहे. ज्या शिक्षकांचा login ID generate झालेला नाही, अशा शिक्षकांनी Affiliation Portal मधून त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्य/ संचालक/ अधिविभागप्रमुख यांचेकडून नव्याने login ID generate करून घेवून, ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. अर्ज भरत असताना login ID Confirm करूनच अर्ज भरणे आवश्यक आहे. संबंधित पात्र संशोधन मार्गदर्शकांनी विहित मुदतीत ऑनलाईन फॉम भरणेची कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक हे आपल्या अधिविभागामधील/महाविद्यालयामधील/संस्थेमधील सर्व मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक यांच्या निर्दशनास आणावे.

आपला विश्वासु,

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

प्रत – संगणक केंद्र.